# 21व्या शतकातील मराठी आदिवासी कादंबरी

**प्रा. डॉ. बंडू चौधरी**
*सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख*
*समर्थ महाविद्यालय, लाखनी जि . भंडारा*

आठशे वर्षाची परंपरा लाभलेल्या मराठी साहित्याला अर्वाचीन कालखंडात त्यातही स्वातंत्र्योत्तर कालखंडात विविध परिमाणे लाभून विविध वाङमयप्रकार उदयास आले. त्यात कवीता, कथा, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, कादंबरी यासारखे वाङमयप्रकार भरभराटीस आलेत त्याच बरोबर विविध समाजवास्तवाचा वेध घेत दलित साहित्य, ग्रमीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, मनोविश्लेषनवादी साहित्य यांनी समाजमनाचा ठाव घेतल्याचे दिसून येते. व या संपूर्ण साहित्यप्रवाहात आदिवासी साहित्याचा प्रवाह सुध्दा अत्यंत सक्षमपणे समाजासमोर येतांना दिसतो.

स्वातंत्र्यपुर्व काळात समाजातील विविध घटकांचा विकास होत असतांना समाजमनापासून कोसो दुर राहून अन्याय अत्याचार सहन करीत, रुढी परंपरेत गुरफटलेल्या व जंगल खोऱ्यातच आपले भावविश्व शोधणारा समाज मात्र विकासाच्या मार्गापासून कोसो दुर राहिला. परंतु स्वातंत्र्याच्या कालखंडात शिक्षणाची कास समाजातील तळागळापर्यंत पोहचल्याने या शिक्षणाचा अवलंब करीत आदिवासी समाज सुध्दा आपल्या विकासाच्या दिशा भोधू लागला. गांधी, आंबेडकर, मार्क्स यांच्या तत्वज्ञानाचा अवलंब करुन आपल्या स्वातंत्र्याची संकल्पणा समाजवास्तवतेत भोधण्याचा प्रयत्न करु लागला परंतु याचा भोध प्रत्यक्ष जीवनव्यवहारात न लागल्याने आपल्या जीवनात आलेली अस्थिरता, रुढी परंपरेच्या चिखलात रुजली गेलेली जीवनानुभूतता आदिवासी समाज आपल्या साहित्यातून मांडून आपल्या न्याय हक्काच्या लढयासाठी प्रयत्न करु लागला व यातुनच आदिवासी साहित्यप्रवाहाचा साठोत्तरी कालखंडात विविध साहित्यपरंपरेच्या सहवासात उदय झाला.

साठोत्तरी कालखंडात मराठी साहित्याने विविध वाङमयप्रकाराच्या माध्यमातून लालीत्य, तत्वचितनात्मक, वैचारिकतेच्या पातळया घटट रोवून समाजवास्तवाचा भोध घेण्याचा प्रयत्न केला त्यात कथा, कवीता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र यासारख्या वाङमयप्रकारांनी विशेष भर टाकल्याची दिसून येते. या सर्व वाङमयप्रकारात जीवनानुभूतीच्या दृष्टीकोणातून समाजवास्तवाचा वेध घेणारा वाङमयप्रकार म्हणून कादंबरी या वाङमयप्रकाराचा विचार करावा लागतो.

दिडशे वर्षाची परंपरा लाभलेला कादंबरी हा वाङमयप्रकार बाबा पद्मनजीच्या "यमूनापर्यटन" कादंबरी पासून उदय होवून यमूनापर्यटन प्रवृत्ती, मोचनगड प्रवृत्ती , मुक्तमाला प्रवृत्ती या प्रवृत्तीचा स्विकार करत विविध वाटावळणांनी साठोत्तरी कालखंडापर्यंत बहारास आला. मुळातच भालचंद्र नेमाडेच्या म्हणण्यानुसार कादंबरी हा समाजजीवनाची नोंद घेणारा, विस्तृत भाषीक अवकाश असणारा दिर्घ निर्मितीकाळ घेणारा वास्तवनिष्ट वाङमयप्रकार असल्याने स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठीतील विविध प्रवाहांनी हा वाङमयप्रकार हाताळला आहेत यातच आदिवासी मराठी साहित्यांनी सुध्दा आपल्या जीवनानुभूतीचा संघर्ष मांडण्यासाठी कादंबरी हा वाङमयप्रकार हाताळतांना दिसून येते.

मराठी आदिवासी कादंबरीचा विचार करतांना आदिवासींच्या जीवनावर लिहिण्यात आलेली व आदिवासी समाजाला केंद्रबिदू मानून निर्माण झालेली कादंबरी आपल्या नजरेसमोर स्वाभाविकपणे येते. "आदिवासी समाजाचे जीवनदर्शन घडविणारी व आदिवासी समाजकेंद्राभोवती आकारास आलेली कादंबरी म्हणजे आदिवासी कादंबरी" अशी सर्वसाधारण व्याख्या करता येते. आदिवासी साहित्याच्या अभ्यासकांनी याच प्रकारची भूमीका घेतल्याचे दिसून येते. मराठीमध्ये आदिवासींच्या जीवनावर ज्या काही कादंबऱ्या पहिल्या टप्यात लिहिल्या गेल्या त्या आदिवासी जीवनाबद्दल सहानुभूती असणाऱ्या आदिवासीतर कादंबरीकाराकडून लिहिल्या गेल्या व्यापक अर्थाने त्यांचा समावेश आदिवासी कादंबरीमध्ये करावा लागतो. त्यांनी ज्या काही कादंबऱ्यांची रचना केली त्यातून आदिवासी कादंबरीला पाठबळ मिळून साठोत्तरी कालखंडात आदिवासी कादंबरी स्थिरावू लागली.

मराठी आदिवासी कादंबरी जरी साठोत्तरी कालखंडापर्यंत मराठी साहित्याच्या क्षितीजावर स्थिरावली असली तरी मराठी आदिवासी कादंबरीच्या विकासाला चालना खऱ्या अर्थाने 21 व्या शतकातपायला मिळतो. या कालखंडात प्रत्यक्ष आदिवासी साहित्यीक सुध्दा आपल्या जीवनानुभवाच्या कक्षा रुंदावत कादंबरी लेखनास पुढे सरसावले. यातूनच आदिवासी आणि बिगर आदिवासी यांच्या साहित्यरुचीच्या समन्वयातून आदिवासी कादंबरीचा विकास होतांना दिसतो. म्हणूनच 21 व्या शतकातील मराठी आदिवासी कादंबरीच्या परामर्श घेणे उचित ठरते. 20 व्या भातकाच्या उत्तरार्धात अनंतराव पाटील यांची "झडीचे दिवस" ( 1981 ) ही कादंबरी मराठी आदिवासी कादंबरीच्या क्षितीजपटलावर येवून महाराष्ट्रातील प्रमूख आदिवासी भिल्ल जमातीचे जीवनचित्रण करते. या कादंबरीतून उदरनिर्वाहाचे प्रश्न सोडविण्यासाठी भिल्ल जमातीच्या संघर्षाची गाथा मांडली आहेत. दादा देशकर यांची "न्यायदंड" ( 1982)ही कादंबरी येते. त्याच बरोबर महाश्वेतादेवी या बंगाली लेखीकेच्या "अरेण्य अधिकार" या कादंबरीचा प्रभा श्रिनिवास यांनी 1983 ला भाषांतरीत करुन मराठी वाचकांच्या दालनात आणली एकुणच या कादंबरीच्या माध्यमातून आदिवासी कांतीकारक बिरसा मुंडाच्या तेजस्वी बंडाची कहाणी सांगून आदिवासी समाजामध्ये प्रेरणेची हुंकार भरतांना दिसते त्याच बरोबर

मराठी आदिवासी कादंबरी प्रादे ीकतेच्या बेडया तोडतांना दिसते .

अनिल सहस्त्रबुध्दे यांच्या "डांगाणी" (1985), "अहिनुकूल" (1986),"वावटळ" यासारख्या कादंबऱ्या येतात. "डांगाणी" कादंबरीतून प्रामूख्याने अहमदनगर जिल्हातील डांगाणी प्रदे ात वास्तव करणाऱ्या कोळी जमात व ठाकर जमात यांच्या उदरनिर्वाह, उदयोग ीलता, शिक्षणाचा दुराभाव, वाढती रुढी परंपरा यातून एकाच प्रवर्गात येणाऱ्या जमांतीचे संबंध कसे एकोप्याचे होतात यावर प्रकाश टाकतात तर "अहिनुकूल" कादंबरीतून स्वातंत्रपूर्व काळातील आदिवासी स्वातंत्रविरांच्या लढयाचे चित्रण करुन आदिवासी जमातीवरील अन्याय शोषणाचा जाब विचारतांना दिसते दिनानाथ मनोहर "आंदोलन" (1988) ,"मन्वंतर" (1999) यांच्या कादंबऱ्या येतात मनोहरांनी "आंदोलन" कादंबरीतून आदिवासी जमातीचा भ्रष्टाचाराविरुध्दचा संघर्ष रंगविला असून "मन्वंतर" या ऐतिहासीक कादंबरीतून स्वातंत्र्यपूर्वकाळात भिल्ल, कोळी, रामोशी या आदिम जमातीने बंडाची कहाणी सांगून नव आदिम बांधवांना प्रेरणा देतात. भारद दळवी यांची "एकलव्य" (1988) ही कादंबरी सुध्दा या प्रवाहात मिळतांना दिसते.

सुरेश द्वादशीवार "हाकुमी" ( 1989 ) कादंबरीतून भामरागड परिसरातील माडीया गोंड या आदिम जमातीच्या पहिला वैद्यकीय डॉक्टर असलेल्या कन्ना व रुपीच्या प्रेमजीवणाचे चित्रण करुन एकुणच माडीया गोंड जमातीच्या जीवनसंस्कृतीचे दर्शन घडवितात तर मधुकर वाकोडे "झेलझपाट" ( 1986) या मेळघाट परिसरातील कोरकू जमातीची पार्श्वभुमी आली असूण यातून कोरकूंचे निसर्गनिष्ट जीवन, बदलत्या सामाजिक जाणिवा त्याचा नागरी समाजाशी येणारा संबंध, सहकारी व सरकारी योजनांचे प्रयोग यासारखे विषय येतात तर "सिलिपशेरा" (1999) या कादंबरीत खेडोपाडी फिरणाऱ्या व पाल उभारुन आपल्या जीवणाचा गाडा ओढणाऱ्या भटक्या जमातीचे चित्रण करतात.

जगदीश गोडबोले यांच्या "पारध" (1989) कादंबरीत कोसलनारच्या जंगलात राहणाऱ्या कोरिया या बिगर महाराष्ट्रीयन आदिम जमातीचे जीवन दर्शन घडविले असून यातून आदिम जमात आपले पिढीजात हक्क मिळविण्यासाठी भ्ाासणाच्या विरोघात आंदोलन करतांना दिसतात तर जागतिकीकरणाच्या पर्वावर विश्वास पाटील यांची "झाडाझडती" (1991) या कादंबरीतून धरणाग्रस्तां च्या समस्यांचा वेध घेतला असूण धरणग्रस्त भोतकरी, आदिवासी जमातीच्या हालअपेष्टा, पुढारी आणि सरकारी अधिकाऱ्यांचे दुप्पटी धोरण संधीसाधू राजकारण यासारखे विषय मांडून जागतीकीकरणाच्या कालखंडात समाजमनाचे सुक्ष्म पदर उलगडतांना दिसतात. विलास मनोहर यांनी "एका नक्षलवाद्याचा जन्म" (1992) या कादंबरीतून सरकारी धोरण व नक्षलवादी पाशाच्या जाळयात अडकलेल्या माडीया जमातीची कर्मकहाणी मांडली आहेत .

1992 ला संयुक्त राष्ट्रसंघटनेने आदिवासी वर्ष साजरे केले याच पार्श्वभुमीवर नजुबाई गावित या पहिल्या बंडखोर आदिवासी स्त्रीलेखीकेची "तृष्णा "(1995 ) ही आत्मवृत्तपर कादंबरी येवून यातून खास आदिवासी जाणिव नेनिवेतून जे अनुभवले जे भोगले याचा वास्तवनिष्ट जीवनानुभव व्यक्त होतो त्याच बरोबर राजन खान यांची "हयात आणि मजार" (1995) या दोन भागातील कादंबरीच्या पहिल्या भागात ठाकर जमातीतील स्त्रीयांच्या भोषणाची कहाणी अधोरेखीत करतात .

आबेंडकरवादी कादंबरीकार माधव सरकुंडे यानी "वाडा" (1996) कादंबरीतून आंध आदिवासी समाजाचा सामाजीक सांस्कृतीक लेखाजोखा मांडला भांकरराव खरात यांची "पारधी" (1997) कादंबरी सुध्दा याच सुमारास येतांना दिसते. एकनाथ साळवे "एन्काउंटर" (1998) कादंबरीतून आदिवासींच्या मानवी हक्कांची होणारी पायमल्ली व आदिवासी समाजापर्यंत पोहचलेला नक्षलवाद यांच्या चक्रव्युव्हात सापडलेल्या जमातीच्या संघ ाची कहाणी रेखाटतात आणि याच दशकातील भोवटच्या पर्वावर आदिवासी जमातीतून आलेल्या व आपले जीवनानुभव व्यक्त करत पोहचलेल्या बाबाराव मडावी यांची "टाहो" (1998) या कादंबऱ्या 21 व्या शतकाच्या उंबरठयावर येताना दिसते.

एकुणच मराठी आदिवासी कादंबरीच्या विकासात जागतिकीकरणाचे पर्व असलेल्या 2000 – 2020 या दोन दशकाला अत्यंत महत्व प्राप्त झाले आहेत . एकिकडे मुक्त व्यापार धोरणाने संपूर्ण बाजारव्यवस्था खुल्या होवून भारतीय विकासाचा भ्ाुभारंभ करण्यात आला तर याच कालखंडात जंगलखोऱ्याच्या आश्रयाला असणाऱ्या आदिवासी जमातींना मोठया प्रमाणात अन्याय, अत्याचाराचा सामना करुन त्यांच्या हक्काची पायमल्ली करण्यात येवून त्यांना विकासापासून वंचित ठेवण्यात आले व याचाच फायदा घेत नक्षलवाद आदिवासी समाजापर्यंत जावून पोहचला. रुढी परंपरेत रखडलेल्या समाजाला जागतीकीकरणाच्या पर्वात विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहेत याचा वास्तववेध या कालखंडातील कादंबरी घेतांना दिसत असली तरी पाहीजे त्या प्रमाणात आदिवासी कादंबरी 21 व्या शतकात लिहिली गेली असल्याचे दिसत नाही. अपवादात्माक म्हणून पांडूरंग कांबळे यांची पारध जमातीवरील हवसू (2015) या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो.

एकुणच 21 व्या शतकातील आदिवासी कादंबरी आदिवासी जमातीतील सुक्ष्मातील सुक्ष्म समस्यांचा वेध घेते तर दुसरीकडे प्रादेशिकतेच्या सीमा तोडून एकात्मतेचे तत्व बाळगून समस्त आदिवासी समुदायाचा वेध घेत असली तरी त्याचे प्रमाण मात्र कमी असल्याचे दिसते. एकुणच "21 व्या शतकातील आदिवासी कादंबरी प्रादेशिकतेच्या सीमा नष्ट करुन पृथ्वीतलावरील समस्त आदिवासी समाजाला एकतेचे तत्व बहाल करतांना दिसते" या अनुशंगाने महाश्वेता देवी यांची "अरेण्य अधिकार" व जगदिश गोडबोले यांची "पारध" ही कादंबरी महत्वपूर्ण ठरते. या कालखंडातील आदिवासी कादंबरीत काही उणिवा सुध्दा दिसून येतात . प्रत्यक्ष आदिवासी समाजातील स्त्री लेखीका कादंबरी लेखनाकडे फारस्या वळल्याचे

दिसत नाही नजूबाई गावित, महा वेता देवी यासारखे बोटावर मोजण्या इतकेच नाव समोर येतांना दिसतात म्हणून हा प्रवाह आदिवासी स्त्रीयांपर्यंत पोहचविने व त्यांचा जीवनानुभव साहित्यात उतरविने महत्वाचे झाले आहेत

एकुणच 21 व्या शतकातील आदिवासी कादंबरी ही नव आदिवासी बांधवांना न्याय हक्कासाठी लढण्याची प्रेरणा देणारी असुन यातून स्त्रीविषयक समस्यांबद्दल प्रस्थपित समाजाला जाणिवजागृती करतांना दिसते. नक्षलवादा सारखी राष्ट्रीय समस्या त्यांच्याशी असलेला संघर्ष, रुढी परंपरेशी चाललेला लढा व्यक्त करत आदिवासींना परिवर्तनाची नांदी देतांना दिसतात

**संदर्भ ग्रंथ**

1. मुनघाटे प्रमोद, "आदिवासी कादंबरी आणि इतर" तनुजा प्रकाशन प्र. आ. २००२
2. वडिखाये रेखा "महायुध्दोत्तर मराठी कादंबरी" लाखे प्रकाशन, प्र. आ. २०१२
3. वाल्हेकर ज्ञानेश्वर, "आदिवासी मराठी साहित्य" स्वरूप प्रकाशन, व्दि. आ. २०१२